नियमित दिवाणी दावा क्र. ११२/२०१७
आय.ए.क्र.१/२०२२

<u>आदेश निशाणी क्र. ५६ वर</u>

1. वादीने या अर्जाने दाव्यामध्ये दुरुस्ती मागितली आहे.

2. वादीचा दावा हा वाटपासाठी आहे. दावा चौकशीसाठी आहे व त्या अनुषंगाने वादीचा सरतपास करण्याची तयारी करीत असताना दाव्याचे संदर्भात काही त्रुटी हस्तदोष इ. आढल्याने दाव्याचे कामी दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून त्या कारणाने दाव्याचे कामी अमुलाग्र बदल होणार नाहीत. प्रतिवादीचे कोणत्याही स्वरुपाचे नुकसान होणार नाही मात्र दुरुस्ती न झाल्यास वादीचे कधीही न भरुन होणारे नुकसान होणार आहे म्हणून प्रस्तुतचा अर्ज.

3. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदविली. वादी जी दुरुस्ती मागत आहेत त्यामुळे दाव्याचा मुळ हेतू व उद्देश बदलून जाणार आहे. दाव्याचे कामकाज लांबविणेसाठी वादीचा अर्ज आहे. म्हणून अर्ज नामंजूर करण्याची विनंती या प्रतिवादी यांनी केली आहे.

4. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दावा हा वाटपा संदर्भात आहे. वादीला सदरची दुरुस्ती करण्याची संधी देणे आवश्यक आहे. अशा दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे नुकसान नाही कारण ते त्यावरील त्यांचे म्हणणे सादर करु शकतात. परंतु दुरुस्तीस परवानगी नाकारल्यास वादीच्या न्याय हक्कास बाधा येईल. दोन्ही बाजूंमधील प्रश्न योग्य प्रकारे निर्णित करण्यासाठी त्यांना पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. म्हणून अर्ज मंजूर करणे योग्य होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आ दे श</u>

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. वादीने मुदतीती दुरुस्ती करावी.

सही/-

दि. ३१/०१/२०२२ ( अर्चना श्रीपत नलगे )

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| a Name of the Stenographer | : Shirsikar V.G. |
| b Court | : 2nd Jt. Civil Judge S.D.Pandharpur |
| c Date of Judgment | : 31/01/2022 |
| d Judgment signed by P.O. On | : 31/01/2022 |
| e Judgment uploaded on | : 31/01/2022s |